वर्ष : ०५ | अंक: ०९ | मुंबई, मंगळवार २२ जानेवारी २०१९ ते २८ जानेवारी २०१९ | पृष्ठ: ४

# पोलीस बातमी पत्र

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

Website: www.policebatmipatra.com
www.policebatmipatra.in

संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादक:- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 मुंबईवर काळ्या दम्याचे संकट

3 → लाजिरवाणी संगीत खुर्ची

निवडणुकीपूर्वी काँग्रेस देणार भाजपला धक्का ← 4




## विरोधी पक्षांच्या एकमुखी आवाजानं 'तोफ' का थरथरली?



# शिवसेनेचा मोदींना सवाल


## पंतप्रधानांनी जुमलेबाजीतून बाहेर पडावं; शिवसेनेचा मोदींना सल्ला

**मुंबई: मोदी यांनी कुठेतरी जाऊन तोफेवर बसून एक भाषण केले. तोफेवर बसलेल्या मोदींनी विरोधी टोळक्याची पर्वा का करावी? २२ विरोधी पक्षांच्या एकमुखी आवाजाने 'तोफ' का थरथरली? असे प्रश्न शिवसेनेने पंतप्रधानांना विचारले आहेत. मोदींना हटवायचे की ठेवायचे याचा निर्णय जनता घेईल. भाजप, मोदी सरकारच्या चुकीच्या कामांवर बोट ठेवताच शिवसेनाही लोकविरोधी, देशविरोधी होऊ शकते; पण जनतेला सर्व समजते. २२ पक्षांनी एकजुटीचे दर्शन घडविले. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या तोफाही गढूळ पाण्याच्या पिचकाऱ्या सोडू लागल्या, असा टोला शिवसेनेनं लगावला आहे.**

ममता बॅनर्जींच्या व्यासपीठावर काल जे गेले ते सगळे लोकविरोधी, देशविरोधी किंवा चोर आहेत असे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी बजावले आहे. विरोधकांची आघाडी पंतप्रधान मोदी यांनी इतकी मनावर घेण्याचे कारण नाही व ते सर्व एकत्र आले म्हणून त्यांची 'लोकविरोधी' 'देशविरोधी' अशी खिल्लीही उडविण्याचे कारण नाही. विरोधकांच्या महाआघाडीत असे अनेक चेहरे-मोहरे आहेत की, जे वाजपेयी व मोदींच्या राष्ट्रीय आघाडीत सामील झाले होते. स्वतः ममता बॅनर्जी वाजपेयी सरकारात मंत्री होत्या. चंद्राबाबू नायडू, डी.एम.के., फारुख अब्दुल्ला, शरद यादव, अरुण शौरी, यशवंत सिन्हा, गेगाँग अपांग हे लोक राष्ट्रीय लोकशाही आघाडीत येत-जात राहिलेच आहेत. खुद्द मायावती यांनी भाजपला साथ दिली आहे. हे सर्व लोक तेव्हा देशविरोधी नव्हते, पण आज देशाचे शत्रू बनले. नितीशकुमार यांनी मोदी यांची साथ सोडली तेव्हा तेसुद्धा देशविरोधी झाले व पुन्हा त्यांनी मोदींना टाळी दिली तेव्हा तेच नितीशकुमार देशप्रेमी झाले. देशाच्या पंतप्रधानपदावरील व्यक्तीने या जुमलेबाजीतून बाहेर पडले पाहिजे, अशा शब्दांमध्ये शिवसेनेने मोदींचा समाचार घेतला आहे.

लोकशाहीत विरोधी आघाडीस महत्त्वाचे स्थान आहे व विरोधकांचा भडीमार पंतप्रधानांनी संयमाने सहन केला पाहिजे. मोदींचे सरकार हे काही देशाचे शत्रू नाही, पण आपले सरकार 'अमर' आहे या भ्रमातही त्यांनी राहू नये. निवडणुका लढवून जिंकण्याचा व सत्ता टिकविण्याचा त्यांना अधिकार आहे तसा सत्ताधाऱ्यांचे वस्त्रहरण करून त्यांना पराभूत करण्याचा अधिकार विरोधकांना आहे. सर्व काही जनता ठरवते. कालच श्री. मोदी यांनी कुठेतरी जाऊन तोफेवर बसून एक भाषण केले. तशी छायाचित्रे प्रसिद्ध झाली आहेत. तोफेवर बसलेल्या मोदींनी विरोधी टोळक्याची पर्वा का करावी?, असा प्रश्न शिवसेनेने उपस्थित केला आहे.

> **"** जम्मू-कश्मीरात भारतीय जनता पक्षाने लोकविरोधाची पर्वा न करता मेहबुबा मुफ्ती यांच्याशी संधान बांधून सत्ता भोगली. सरकार त्यांनीच पाडले व मेहबुबा यांची भूमिका लोकविरोधी, देशविरोधी असल्याचा डांगोरा पिटायला सुरुवात केली. भाजप, मोदी सरकारच्या चुकीच्या कामांवर बोट ठेवताच शिवसेनाही लोकविरोधी, देशविरोधी होऊ शकते; पण जनतेला सर्व समजते. २२ पक्षांनी एकजुटीचे दर्शन घडविले. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या तोफाही गढूळ पाण्याच्या पिचकाऱ्या सोडू लागल्या. हे चित्र लोकशाहीला बरे नाही, पण सत्ताधारी बेभान झाले की, जे घडते तेच घडताना आम्ही पाहात आहोत, असं म्हणत शिवसेनेने मोदींवर शरसंधान साधलं आहे.




## कर्नाटकात काँग्रेस आमदारांत हाणामारी

**बेंगळुरू** - कर्नाटकात एकाच जिल्ह्यातील काँग्रेसच्या दोन आमदारांमध्ये शनिवारी रात्री हाणामारी झाल्याने राज्यात सुरू असलेल्या राजकीय सत्तानाट्याला वेगळेच वळण लागले आहे. काँग्रेसचे आमदार जे. एन. गणेश यांनी सहकारी आमदार आनंद सिंह यांच्या डोक्यात बाटली मारल्याने आनंदसिंह हे जखमी झाले असून, त्यांच्यावर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

कर्नाटकातील धर्मनिरपेक्ष जनता दल-काँग्रेस आघाडी सरकार पाडण्याच्या भाजपकडून कथित हालचाली सुरू असल्याच्या पार्श्वभूमीवर खबरदारी म्हणून काँग्रेसच्या सर्व आमदारांना शहराबाहेरील इगलटन रिसॉर्टमध्ये ठेवण्यात आले आहे. परंतु, याच रिसॉर्टमध्ये बळ्ळारी जिल्ह्यातील कम्पली विधानसभेचे आमदार जे. एन. गणेश आणि याच जिल्ह्यातील होसपेट मतदारसंघाचे आमदार आनंदसिंह हे दोन आमदार एकमेकांना भिडले. हमरीतुमरीवरून सुरू झालेल्या वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले. 'हाणामारीत आनंदसिंह यांच्या डोक्याला मार लागला असून, त्यांचे डोळे काळे-निळे झाले आहेत. त्यांची प्रकृती आता स्थिर आहे,' असे हॉस्पिटलमधील सूत्रांनी सांगितले.

## जिध्दी मराठा प्रतिष्ठानचे प्रदीप जंगम व सत्यकाम फाऊंडेशनचे कृष्णा गुप्ता यांनी श्राद्ध विधी पार पाडताच

# पालिकेचा दवाखाना सुरु








जिद्धी मराठा प्रतिष्ठान चे प्रदीप जंगम व कृष्णा गुप्ता यांनी शासनाचे व पालिका अधिकाऱ्यांचे १३ वे विधी व श्राद्ध कार्य पार पाडताच पालिकेचा दवाखाना सुरू करण्यात आला.

पालिकेच्या आरक्षणावर बांधलेल्या भाईदरच्या सेव्हन इलेव्हन रुग्णालयातील पालिकेचा दवाखाना शनिवार दि. १९.०१.२०१९ च्या सकाळपासून सुरु करण्यात आला. त्यामुळे तब्बल १४ दिवसांपासून दवाखाना सरु व्हावा, म्हणून साखळी उपोषणास बसलेल्या जिद्दी मराठा प्रतिष्ठान व सत्यकाम फाऊंडेशनने आंदोलन मागे घेतले. सहा वर्षानी नागरिकांना पालिकेचा हक्काचा दवाखाना मिळाला आहे. पहिल्या दिवशी ४० जणांनी वैद्यकीय सुविधेचा लाभ घेतला. या आंदोलनामुळे पालिका आयुक्तांसह भाजपा आमदार , महापौरंवर टिकेची झोड उठली होती. आमदार नरेंद्र मेहता , महापौर डिम्पल मेहता यांच्या संबंधितांच्या सेव्हन इलेव्हन कंपनीने सेव्हन स्क्वेअर शाळेसमोर पालिका आरक्षणात बांधलेल्या रुग्णालयातील दोन मजली भाग महापालिकेला बांधून दयायचा होता. परंतु, २०१३ पासुन रुग्णालय सुरु केले , पण पालिकेला जागा न दिल्याने दवाखाना

उर्वरित पृष्ठ 2 वर

## जनावरांची तस्करी करणाऱ्या वाहनानं पोलिसाला चिरडलं



**चंद्रपूर – जनावरांची तस्करी करणाऱ्या वाहनानं पोलीस शिपायाला चिरडल्याची घटना नागपूर-चंद्रपूर महामार्गावर घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. रात्री अकराच्या सुमारास ही घटना घडली. यामुळे तस्करांच्या वाढत्या मुजोरीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.**

यवतमाळहून नागपूरकडे जाणाऱ्या एका वाहनातून जनावरांची तस्करी होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यामुळे नागपूर-चंद्रपूर महामार्गावरील खांबाडा चेकपोस्टवर बॅरिकेडिंग करण्यात आलं होतं. जनावरांची तस्करी करणारं वाहन रात्री अकराच्या सुमारास चेकपोस्टवर आलं. त्यावेळी पोलिसांनी वाहन थांबवण्यास सांगितलं. मात्र वाहन चालकानं वेग वाढवला आणि एका शिपायाला चिरडलं. यामध्ये शिपायाचा मृत्यू झाला. प्रकाश मेश्राम असं या पोलीस शिपायाचं नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी दोघांना अटक केली.

दोनच महिन्यांपूर्वी चंद्रपूरात अवैध दारुची वाहतूक करणाऱ्या वाहनानं पोलीस उपनिरीक्षक छत्रपती किडे यांना चिरडलं होतं. किडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. ते नागभीड पोलीस ठाण्यात कार्यरत होते. छत्रपती किडे मौशी चोरगावजवळ गस्तीवर असताना ही घटना घडली. अवैध दारुची वाहतूक करणाऱ्या वाहनानं किडे यांना उडवलं. त्यांना जखमी अवस्थेत ब्रम्हपुरीतल्या एका रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## सौजन्य व्हॉट्सअप




## अंधेरी साईवाडी येथे सिनिअर सिटीझन सोशल राईट्सच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान सत्कार सोहळा





आश्रय ट्रस्ट संस्थापक दिपक मोरेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाने सलंग्न सिनिअर सिटीझन सोशल राईट्सच्या वतीने प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी साईवाडी अंधेरी येथे जेष्ठ नागरिकांसाठी विविध प्रकारचे कार्यक्रम व वाढदिवस साजरे करण्यात येतात. यावेळेस अंधेरी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षकराजकुमार हसबे हे प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. त्याचप्रमाणे अंधेरी पोलिस स्टेशनचे विविध पदावर असलेले पोलिस अधिकारी मोठया प्रमाणावर उपस्थित होते. मागील ४ वर्षांपासून प्रत्येक महिन्याला विविध क्षेत्रामध्ये कामगिरी बजावलेले उच्च पदस्थ अधिकारी उपस्थित राहून जेष्ठ नागरिकांना आपले अनुभव सांगून मार्गदर्शन करतात. अशा या कार्यक्रमाचे नियोजन सिनिअर सिटीझन सोशल राईट्स फाऊंडेशन राष्ट्रीय उपसचिव संतोष चौधर हे करत असुन अंधेरी कमिटी अध्यक्षा श्रीमती तुकाबाई चौधर यांच्या सहकार्याने घेण्यात येते. या कार्यक्रमामध्ये अंधेरी पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलिस निरीक्षक राजकुमार हसबे, पोलिस उपनिरीक्षक बोराटे, व पोलिस अधिकारी समिर या सर्वांनी अतिशय उत्तम प्रकारे जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन केले व त्यांच्या हस्ते जेष्ठ नागरिकांना शाल व श्रीफळ देऊन जेष्ठ नागरिकांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये नेहमीप्रमाणे पत्रकार अनंत दाभोळकर, पंढरीनाथ खंडागळे, उल्हास शिरसोळे, दिलीप प्रभू, हरिश्चंद्र रेवाळे, काशिराम मांडवकर, दिपक महाडिक व महादेव पारदळे यांनी अथक मेहनत घेऊन सदर कार्यक्रम पार पाडला.

# वक्फ बोर्डच्या निवडणुकीत भाजपाची गोची!

**मुंबई : केंद्रात व राज्यात सत्तेवर आल्यापासून प्रत्येक लहान-मोठ्या निवडणुकीत वरचष्मा गाजविणाऱ्या भाजपाची महाराष्ट्र वक्फ बोर्डच्या सदस्यपदाच्या निवडणुकीत मात्र गोची झाली आहे. विधिमंडळातील मुश्लीम आमदारांतून सदस्य निवडण्यात येणार आहे. मात्र दोन्ही सभागृहांत भाजपाचा एकही मुश्लीम सदस्य नसल्याने त्यांना सहभागच घेता येणार नाही.**



राष्ट्रवादीचे विधान परिषद सदस्य बाबाजानी दुरानी यांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज भरला. महिलांसाठी राखीव असलेल्या एका जागेसाठी काँग्रेसच्या विधान परिषद सदस्या हुस्ना बानो कुरेशी या एकमेव महिला आमदार असल्याने ही निवडणूक बिनविरोध होण्याचे जवळपास निश्चित आहे. दुरानी हे वक्फ बोर्डाचे विद्यमान सदस्य असून दुसऱ्यांदा पक्षाने त्यांना संधी दिली आहे.

राज्यातील विविध ठिकाणची शेकडो एकर अतिक्रमित जागा, प्रलंबित खटले, अध्यक्षावरील भ्रष्टाचाराचा आरोप आणि सरकारचे दुर्लक्ष या बाबीमुळे महाराष्ट्र वक्फ बोर्ड वादातच राहिले आहे. औरंगाबादेत मुख्यालय असलेल्या या मंडळात एकूण बारा सदस्य संख्या असून त्यापैकी दोन जागा या विधिमंडळातील आमदारांसाठीच्या आहेत. त्यापैकी एक जागा महिलांसाठी राखीव असून या दोन जागांसाठीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. मुंबई शहरचे जिल्हाधिकारी हे निवडणूक निर्णय अधिकारी आहेत. अर्ज दाखल करण्याची अखेरची तारीख २१ जानेवारी असून दोनपेक्षा अधिक अर्ज आल्यास ४ फेब्रुवारीला मतदान होतील.

'सबका साथ, सबका विकास' म्हणत केंद्रात व राज्यात सत्तेत आल्यानंतर भाजपाकडे मुश्लीम कार्यकर्त्यांची संख्या झपाट्याने वाढत राहिली आहे. त्यापैकी काहींना मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ, राज्य अल्पसंख्याक आयोग व वक्फ बोर्डच्या सदस्य पदावर नियुक्ती करून पक्ष सर्वसमावेशक असल्याचा संदेश दिला आहे. मात्र 'वक्फ'मधील आमदार सदस्याच्या निवडणुकीसाठी विधानसभा, विधान परिषदेत एकही सदस्य नसल्याने त्यांना या निवडणुकीत सहभागीच होता येणार नाही.

# मुंबईवर काळ्या दम्याचे संकट

**मुंबई - मुंबईतील बांधकामे, वाहनांची गर्दी, कारखाने आदी कारणांमुळे हवेचा दर्जा दिवसेंदिवस घसरत असल्याने फुप्फुसांचे आजार वाढत आहेत. यामध्ये प्रामुख्याने काळा दमा म्हणजेच सीओपीडीचे (क्रोनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मनरी डिसिज) प्रमाण वाढत आहे. धूम्रपान करणाऱ्यांमध्ये मुख्यत्वे हा आजार आढळतो. मात्र प्रदूषित हवेमुळे आता धूम्रपान न करणाऱ्यां व्यक्तींनाही या आजाराची बाधा होत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.**

हवेतील विशिष्ट प्रकारचे घातक कण श्वासावाटे शरीरात जातात. त्यामुळे फुप्फुसावर दुष्परिणाम होतो आणि सीओपीडी हा आजार जडतो. देशातील एकूण रुग्णांपैकी जवळपास एकतृतियांश रुग्णांना धूम्रपानामुळे हा आजार होतो. या व्यतिरिक्त इंधन ज्वलनातून निर्माण होणारा धूर आणि प्रदूषित हवा हीदेखील या आजारामागची कारणे आहेत. गेल्या काही वर्षांमध्ये शहरात धूम्रपान न करणाऱ्या रुग्णांमध्येही सीओपीडी आढळून येत आहे. सध्या सीओपीडीच्या तक्रारी घेऊन येणारे जवळपास ४० टक्के रुग्ण हे धूम्रपान न करणारे आहेत. वाढलेले हवेचे प्रदूषण हेच सीओपीडीच्या वाढण्याचे एक प्रमुख कारण असल्याचे



मत फुप्फुसरोगतज्ज्ञ डॉ. विकास ओसवाल यांनी व्यक्त केले. सीओपीडीप्रमाणेच दम्याच्या तक्रारीही वाढल्या आहेत. पूर्वी या रुग्णांना हिवाळ्यातच अधिक त्रास होत असे. परंतु आता प्रदूषणामुळे वर्षांतून तीन ते चार वेळा दम्याचा त्रास बळावत असल्याचेही डॉ. ओसवाल यांनी सांगितले.

***चेंबूरमध्ये रुग्ण सर्वाधिक***

शहरातील ज्या भागांमध्ये हवा प्रदूषित करणाची क्षमता अधिक असणारे (एसपीएम) घनरूप कणांचे प्रमाण वाढले आहे अशा ठिकाणी खोकला, दम लागणे, श्वास घेण्यास त्रास होणे अशा तक्रारी अधिक असल्याचे केईएम रुग्णालयाच्या संशोधनामध्ये सिद्ध झाले आहे. केईएम रुग्णालयाच्या श्वसनविकार विभागाच्या प्रमुख डॉ. अमिता आठवले या संशोधनातील मुख्य संशोधक असून त्या सांगतात, चेंबूर भागातील मरावली भागामध्ये सर्वाधिक एसपीएम आढळले असून, श्वसनविकारग्रस्तही अधिक आहेत. एसपीएमचे प्रमाण २०० ते ४०० असलेल्या भागांत १०.६ टक्के रुग्णांना खोकल्याचा त्रास होत असल्याचे दिसते. तर एसपीएमचे प्रमाण ५०० हून अधिक असलेल्या भागांमध्ये खोकल्याचे ४०.६ टक्के रुग्ण आढळले. शहरामध्ये बांधकाम, वाहनांमधून निघणारा धूर, कबुतरांमुळे होणारा संसर्ग यावर नियंत्रण ठेवणाऱ्या पर्यायांचा विचार होणे गरजेचे आहे.

# ...तर ठाकरे सिनेमा प्रदर्शित होऊ देणार नाही, संभाजी ब्रिगेडचा इशारा

शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आयुष्यावर ठाकरे हा सिनेमा येतो आहे. २५ जानेवारीला हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे. मात्र संभाजी ब्रिगेडने या सिनेमाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.



ठाकरे सिनेमाचा ट्रेलर प्रदर्शित झाला. यामध्ये बाळासाहेब ठाकरे यांची व्यक्तीरेखा साकारणारा अभिनेता नवाजुद्दीन सिद्दीकी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पायात चपला घालून पुष्पहार पुष्पहार अर्पण करताना दिसतो आहे. याच दृश्याला संभाजी ब्रिगेडने आक्षेप घेतला आहे. संभाजी ब्रिगेडचे प्रदेश संघटक कपिल ढोके यांनी ही भूमिका पत्रकारांशी बोलताना मांडली. तसेच हे दृश्य सिनेमातून वगळण्याची मागणी केली. हे दृश्य वगळले नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात सिनेमा प्रदर्शित होऊ देणार नाही असाही इशारा त्यांनी दिला. संभाजी महाराज हे महाराष्ट्राची अस्मित आहेत. मात्र या सिनेमातला तो पुष्पहाराचा प्रसंग संभाजी महाराजांचा अपमान करणारा आहे. सिनेमातील हे दृश्य तातडीने वगळण्यात यावे. निर्माता आणि दिग्दर्शक यांनी यासंदर्भातला निर्णय तातडीने घ्यावा नाहीतर हा सिनेमा या दृश्यासह प्रदर्शित होऊ देणार नाही असे ढोके यांनी म्हटले आहे.

# अंधेरीत २५ वर्षीय तरुणीची निर्घृण हत्या

**मुंबई** – अंधेरीत २५ वर्षीय तरुणीची हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. डी.एन.नगर पोलिसांनी काहींना चौकशीसाठी ताब्यात घेतले असून, तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचा संशय आहे.



आसमा निसार शेख (२५) ही तरुणी अंधेरीत राहायची. शनिवारी सकाळी ९च्या सुमारास तिचा छिन्नविच्छिन्न अवस्थेतील मृतदेह जंगल परिसरात स्थानिकांना आढळला. ओळख पटू नये, म्हणून तिच्या डोक्यावर दगडाने हल्ला करत, तिचा चेहरादेखील ठेचला होता. डी. एन.नगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत, मृतदेह शवविच्छेदनासाठी कूपर रुग्णालयात पाठविला. तासाभरानंतर तिची ओळख पटली. आसमा ही शुक्रवारी रात्रीपासून घरातून बेपत्ता होती. ती साडेआठच्या सुमारास घरातून बाहेर पडली. मात्र, परतली नाही, पण तिला अशाप्रकारे बाहेर राहण्याची सवय होती, असे तिच्या आईने पोलिसांना सांगितले. त्यामुळे घरच्यांनी ती बेपत्ता असण्याची तक्रार केली नसल्याचे, डी.एन.नगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक परमेश्वर गणमे यांनी सांगितले. सूत्रांच्या माहितीनुसार, सुनीताचा स्थानिक परिसरातील काही लोकांशी वाद झाला होता. त्यांनीच तिची हत्या केल्याचा संशय आहे. डी. एन.नगर पोलिसांनी चौकशीसाठी विशेष पथक नेमले आहे.

# वीजबिलावरील मीटर रीडिंगचा फोटो आता होणार गायब

**मुंबई** : महावितरणकडून वीजबिलाबाबत तसेच मीटर रीडिंगबाबतची अद्ययावत माहिती एसएमएसद्वारे ग्राहकांच्या अधिकृत मोबाइलवर दिली जाते. छापील वीजबिल ग्राहकांना मिळण्यापूर्वीच मीटर रीडिंगची माहिती त्यांना मिळत असल्यामुळे आता १ फेब्रुवारीपासून महावितरणने वीजबिलावरील मीटर रीडिंगचा फोटो देण्याची पद्धत बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.



वीज ग्राहकांना वीज मीटरच्या रीडिंगची अचूक माहिती मिळावी म्हणून देशात महावितरणने सर्वप्रथम वीजबिलावर मीटर रीडिंगचा फोटो प्रसिद्ध करण्याची पद्धत सुरू केली होती. या निर्णयाचा महातिवरणसह ग्राहकांनाही पारदर्शक वीज बिलासाठी उपयोग होत आहे. याच्या पुढचे पाऊल म्हणून डिजिटल युगाशी जुळवून घेत आता महावितरणकडून ग्राहकांना महावितरणसंबंधीच्या विविध सेवांची अद्ययावत माहिती एसएमएसद्वारे देण्यात येत आहे. त्यामुळे मोबाइल नोंदणी केलेल्या ग्राहकांना वीजबिल मिळण्यापूर्वीच मीटर रीडिंग घेतल्यानंतर त्याची माहिती तत्काळ उपलब्ध होते. परिणामी ग्राहकांना आपले मीटर रीडिंग पडताळणीसाठी उपलब्ध होते. तसेच मीटर रीडिंगमध्ये काही तफावत आढळल्यास ती टोल फ्री क्रमांक अथवा नजीकच्या कार्यालयात संपर्क साधून दुरुस्त करता येणे शक्य होते. अशा प्रकारे छापील बिल मिळण्यापूर्वीच ग्राहकांना मीटर रीडिंग समजत असल्यामुळे आता यापुढे वीजबिलावरील मीटर रीडिंगचा फोटो देण्याची पद्धत बंद करण्यात येणार असल्याचे महावितरणने स्पष्ट केले.

सध्या महावितरणकडे २ कोटी ५० लाख वीजग्राहक आहेत. यापैकी सुमारे दोन कोटी सात लाखांहून अधिक ग्राहकांनी मोबाइल क्रमांकाची नोंदणी महावितरणकडे केली आहे. ज्यांनी मोबाइलची नोंदणी केलेली नाही त्यांनी या नव्या सुविधेचा लाभ घेण्यासाठी तत्काळ मोबाइल क्रमांकाची नोंदणी करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

डिजिटल युगाशी जुळवून घेत तसेच वेळेचा अपव्यय टाळण्यासाठी वीज ग्राहकांच्या मोबाइलवर छापील वीज बिल देण्यापूर्वीच मीटर रीडिंगची माहिती उपलब्ध करून दिली जात आहे. वीज ग्राहकांकडे मोबाइल असल्याचे गृहित धरूनच मीटर रीडिंगचा फोटो वीज बिलावर प्रसिद्ध न करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

*इंधन दरवाढीचा भडका*

# पेट्रोल २३ पैसे आणि डिझेल ३१ पैशांनी महागलं



**मुंबई** - सर्वसामान्य जनतेला पुन्हा एकदा इंधन दरवाढीचा भडका सोसावा लागणार असल्याची चिन्हं दिसू लागली आहेत. कारण गेल्या काही दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये सातत्यानं वाढ होत आहे. आजही पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये वाढ झाली आहे. मुंबईमध्ये पेट्रोल २३ पैसे आणि डिझेल ३१ पैशांनी महागले आहे. यानुसार आज मुंबईकरांना पेट्रोल प्रतिलिटर ७६.५८ रुपये आणि डिझेल प्रतिलिटर ६८.५३ रुपयांनी विकत घ्यावे लागणार आहे.

तर नवी दिल्लीत पेट्रोल २३ पैसे आणि डिझेल २९ पैशांनी वाढले आहे. त्यामुळे दिल्लीत पेट्रोल दर प्रतिलिटर ७०.९५ रुपये आणि डिझेलची प्रतिलिटर किंमत ६५.४५ रुपये एवढी आहे. यापूर्वी १८ ऑक्टोबर २०१८ नंतर पेट्रोल-डिझेलच्या किंमतीमध्ये घसरण पाहायला मिळत होती.

# मराठा समाजाच्या उन्नतीकरणासाठी आरक्षण - राज्य सरकार

**मुंबई** - 'मराठा समाज हा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असून या समाजाचे शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमधील प्रतिनिधित्व कमी आहे. त्यामुळे मागासलेपण कमी करून या समाजाचे उन्नतीकरण करण्याच्या हेतूनेच राज्य सरकारने या समाजाला शिक्षण व सरकारी नोकऱ्यांमध्ये १६ टक्के आरक्षण देणारा कायदा केला आहे', असा युक्तिवाद राज्य सरकारने मुंबई उच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्राद्वारे मांडला आहे.

राज्य सरकारने निवृत्त न्यायमूर्ती एम. जी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखालील महाराष्ट्र राज्य मागास प्रवर्ग आयोगाच्या अहवालातील शिफारशींच्या आधारे 'महाराष्ट्र राज्य सामाजिक व आर्थिक मागास प्रवर्ग (राज्यातील शैक्षणिक संस्था व सरकारी सेवांमधील नियुक्त्या) कायदा, २०१८' हा कायदा गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये केला. या प्रवर्गांतर्गत मराठा समाजाला १६ टक्के आरक्षण देण्यात आले. त्याला डॉ. जयश्री पाटील यांनी अ‍ॅड. गुणरतन सदावर्ते यांच्यामार्फत तर संजीत शुक्ला यांनी अ‍ॅड. प्रदीप संचेती यांच्यामार्फत जनहित याचिका करून आव्हान दिले आहे.

उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या याचिकांच्या उत्तरादाखल सरकारतर्फे सामान्य प्रशासन विभागाचे सचिव शिवाजी दौंड यांनी शुक्रवारी प्रतिज्ञापत्र दाखल केले. 'आयोगाने प्रत्येक घटक व प्रत्येक पैलूचा विचार करून आपला अहवाल दिला आहे. सर्वेक्षण, आकडेवारी, अभ्यास, संशोधान, विश्लेषण अशा वेगवेगळ्या आधारांवर आपला निष्कर्ष मांडताना मराठा समाज हा सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागासलेला असून तो भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद १५(४) व अनुच्छेद १६(४) अन्वये आरक्षणासाठी पात्र आहे, असे आयोगाने स्पष्ट केले. सामाजिक न्याय राखणे तसेच समाजात असमानता असेल तर ती दूर करणे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. त्यामुळे असमानता दूर करून विशिष्ट समाजाचे आवश्यक प्रमाणातील प्रतिनिधित्व सुनिश्चित करण्यासाठी ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडण्याकरिता त्या समाजाच्या मागासलेपणाला अधिक महत्त्व



देणे गरजेचे आहे. त्याअनुषंगानेच मराठा समाजाचे मागासलेपण दूर करून उन्नतीकरण करण्यासाठी राज्य सरकारने राज्यघटनेतील कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन न करता कायद्याच्या चौकटीत राहूनच हे आरक्षण दिले आहे', असा दावा सरकारने या प्रतिज्ञापत्रात केला आहे.

# महिला पोलिसाचा विनयभंग आणि पोलीस शिपायाला मारहाण, चौघांना अटक

**मुंबई** : वाहन थांबवून तपासणी केल्याच्या कारणावरून झालेल्या शाब्दिक चकमकीनंतर अन्य सहकाऱ्यांसोबत येऊन इब्राहिम शेख याने भररस्त्यात पोलीस शिपाई ज्ञानेश्वर मेश्राम यांना शिवीगाळी करीत त्यांच्यासोबत असलेल्या महिला शिपायाचा विनयभंग करून पोबारा केला होता. १४ जानेवारी रोजी ही घटना घडली होती. पोलिसांनी आरोपी इब्राहिम अल्लाबक्ष शेख याला अटक केली होती. त्यानंतर फरारी असलेल्या चौघांना अटक करून न्यायालयात नेले असता २ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

गुन्हा करून धूम ठोकणाऱ्या आरोपी असिफ खुदूस शेख, शहाबाद शमशाद खान, मदस्सर उर्फ अफसर मुस्तकिन शेख आणि बुऱ्हाउद्दीन उर्फ बुऱ्हान मुशीउद्दीन शेख यांचा समावेश आहे. १४ जानेवारीला सोमवारी वाहतूक विभागाचे पोलीस शिपाई ज्ञानेश्वर मेश्राम आणि महिला पोलीस शिपाई पॅराडाईज सिनेमा गृहाजवळ कर्तव्य बजावत असताना संध्याकाळी साडे सहा वाजण्याच्या सुमारास एक टॅक्सी वांद्रेच्या दिशेने जात होती. तिला थांबवून चौकशी करताना आरोपी इब्राहिम शेख याच्याशी मेश्राम यांची हुज्जत झाली. शाब्दिक चकमकीनंतर शेख हा अन्य चार साथीदारांच्या सोबत आला आणि मेश्राम यांना



भररस्त्यात शिवीगाळी आणि महिला शिपायाचा विनयभंग केला. सदर प्रकाराची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक कैलास चव्हाण यांना मिळताच ते पोलिसांसह घटनास्थळी पोहोचले. माहीम पोलीस ठाण्यात पाच जणांविरोधात सरकारी कामात अडथळा, शिवीगाळ, विनयभंग अंतर्गत गुन्हा दाखल केला आणि काही तासांतच टॅक्सी चालक इब्राहिम शेख याला अटक केली. त्याच्या चौकशीत पोबारा करणाऱ्या अन्य चार आरोपींची नावे घेऊन पोलिसांनी चौघांना अटक केली. त्यांना न्यायालयात नेले असता त्यांना २ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# मोनिका बेदीला पाहण्यासाठी त्या पोलीस अधिकाऱ्याने बाथरूममध्ये लावले होते सीसीटीव्ही कॅमेरे

मुंबई बॉम्बस्फोट प्रकरणी कुख्यात गुंड अबू सालेमची प्रेयसी मोनिका बेदीचा आज ४४ वा वाढदिवस. अबु सालेमसोबत नाव जोडल्या गेल्यापासून मोनिकाच्या करिअरला उतरती कळा लागली असली तरी तिच्या चाहत्यांची संख्या मात्र दिवसेंदिवस वाढतच आहे. मोनिकाला खोटा पासपोर्ट बाळगण्याप्रकरणी डिसेंबर २००६ ते जुलै २००७ पर्यंत भोपाळमध्ये तुरुंगवास भोगावा लागला होता. या दरम्यान तिथल्या पोलीस अधिकाऱ्याने तिला पाहण्यासाठी प्रत्येक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावले होते. मोनिकाला खोटा पासपोर्ट बाळगण्याप्रकरणी डिसेंबर २००६ ते जुलै २००७ पर्यंत भोपाळमध्ये तुरुंगवास भोगावा लागला होता. या दरम्यान तिथल्या पोलीस



अधिकाऱ्याने तिला पाहण्यासाठी प्रत्येक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावले होते. हे प्रकरण तेव्हा उघडकीस आलं जेव्हा मोनिकाचं एमएमएस बनवण्यासाठी त्याने बाथरूममध्येही कॅमेरे लावले होते.

मोनिका आणि अबू सालेमला भोपाळच्या सेंट्रल जेलमध्ये ठेवण्यात आलं होतं. तेव्हा तिथला पोलीस अधिकारी पुरुषोत्तम सोमकुंवर आणि त्याच्या विभागातील अन्य अधिकारी मोनिकाच्या अवती भवतीच असायचे.

पुरुषोत्तम तर मोनिकाच्या प्रेमातच पडला होता. मोनिकाने एखादी गोष्ट मागितली आणि पुरुषोत्तमने ती दिली नाही असं कधी झालंच नाही. तिची प्रत्येक मागणी पुरुषोत्तम काही मिनिटांत पूर्ण करायचा.

यादरम्यान अशा ही गोष्टी व्हायरल झाल्या होत्या की, मोनिकाला आंघोळीसाठी खास डव साबण दिला जायचा. एवढंच नाही तर दररोज कुठल्या ना कुठल्या थ्री स्टार हॉटेलचं जेवण तिला दिलं जायचं.

मोनिकाच्या सौंदर्यावर तिथले अधिकारी एवढे प्रेमात होते की, वेळेच्या आधी जाणारे अधिकारी वेळ संपूनही तासन् तास ऑफिसमध्येच बसायचे.

# आठ लाखांचे मेफेड्रोन जप्त

**मुंबई** : बंदी असलेल्या मेफेड्रोनची विक्री करणाऱ्या एका तरुणाला पोलिसांनी अटक करून, त्याच्याकडील आठ लाख रुपये किमतीचा ऐवज जप्त केला. गणेश अशोक पठारे (वय ३०, रा. बीएमसी कॉलनी, संतोषनगर, फिल्मसिटी रोड, गोरेगाव), असे त्याचे नाव असून, अंमली पदार्थ विरोधी पथकाच्या घाटकोपर शाखेने शुक्रवारी रात्री ही कारवाई केली.

[illegible] वर्षानगरातील बेस्टच्या रूट क्र. ४१८, ३८६ येथील बस स्टॉपच्या परिसरात उत्तेजक पदार्थांची विक्री करण्यासाठी एकजण येणार असल्याची



माहिती, पथकाच्या घाटकोपर शाखेचे निरीक्षक वधवाने, सहायक निरीक्षक विनोद शिवडकर यांच्या पथकाला समजली. त्यानी परिसरात सापळा रचून संशयास्पदरित्या फिरत असलेल्या पठारेला पकडले. झडती घेतली असता त्याच्याकडे २०० ग्रॅम मेफेडोनच्या गोळ्या मिळून आल्या. त्यांची अंदाजे किंमत आठ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले.

# विलेपार्लेत ४० लाख किंमतीचा गुटखा जप्त



**मुंबई** - विलेपार्ले परिसरातून पोलिसांनी ४० लाख किंमतीचा गुटखा जप्त केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार विलेपार्ले पोलिसांना दुपारी १२ वाजता गुजरातहून एक प्रवासी बस क्र. जीजे १६ ओयु १३३९ मध्ये बेकायदेशीरपणे गुटखा वाहतूक करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार विलेपार्ले पोलिसांनी भाजीवाडी जंक्शन, विलेपार्ले (पूर्व ) येथे या बसवर छापा टाकून ४० लाख किंमतीचा गुटखा जप्त करत २ आरोपींना अटक केली आहे.

# रुबेला, गोवरच्या जनजागृतीसाठी पालिकेचे एक पाऊल पुढे

गोवर आजाराचे निर्मूलन आणि रुबेलावर नियंत्रण मिळविण्यासाठी केंद्र सरकारने हाती घेतलेल्या मोहिमेस मुंबईतील एका विशिष्ठ समाजाकडून सहकार्य मिळत नसल्यामुळे पालिकेच्या आरोग्य विभागासमोर यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे. ही समस्या सोडविण्यासाठी कुर्ला परिसरातील नगरसेविकेने पुढाकार घेत आयोजित केलेल्या बालकोत्सवात पालिकेच्या 'एल' विभाग कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्तांनी आपल्या एक वर्षांच्या बालिकेला सर्वासमक्ष व्यासपीठावरच गोवर, रुबेला लसीकरण करुन जनजागृतीच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकले. हाच कित्ता गिरवीत उर्दू माध्यमाच्या शाळांमधील शिक्षकांनीही याच व्यासपीठावर आपल्या मुलांना लसीकरण करुन घेतले. केंद्र सरकारने २०२० पर्यंत भारतातून गोवर आजाराचे समूळ उच्चाटान करण्याचे आणि रुबेलावर नियंत्रण मिळविण्याचा संकल्प सोडला आहे. भारतात दरवर्षी गोवरमुळे ५० हजार बालके दगावतात. रुबेलाची बाधा बालके आणि प्रोढांमध्येही होत आहे. गर्भवती महिलेस रुबेलाचा संसर्ग झाल्यास नवजात बालकांना अंधत्व, बहिरेपणा, हृदयविकृती होऊ शकते.

पृष्ठ १ वरुन

# जिध्दी मराठा प्रतिष्ठानचे प्रदीप जंगम व सत्यकाम फाऊंडेशनचे कृष्णा गुप्ता यांनी श्राद्ध विधी पार पाडताच पालिकेचा दवाखाना सुरु

व प्रसुतिगृह सुरु झाले नव्हते. याविरोधात आंदोलन व लोकायुक्तांकडे तक्रारीनंतर ऑगस्टमध्ये पालिकेला जागा हस्तांतरीत झाली. पण दवाखाना, प्रसुतिगृह मात्र सुरु केले जात नव्हते.

प्रदीप जंगम, कृष्णा गुप्ता आदींनी पालिकेबाहेर साखळी उपोषण सुरु केले. त्याला शिवसेना, काँग्रेस , श्रमजीवी संघटना, बविआ, कम्युनिस्ट , जनता दल (से.) , समाजवादी पार्टी , मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस , भाजपाच्या माजी महापौर गीता जैन आदींनी पाठींबा दिला.

१४ जानेवारीला दवाखाना सुरु करण्याचे पालिकेने लेखी आश्वासन दिले होते. कंपनीकडून अंतर्गत लादया , रंगकाम , वायरिंग तसेच स्वच्छतागृहाचे कामच पालिकेने करुन घेतले नसल्याचे उघड झाले. दुसरीकडे आंदोलनामुळे आयुक्तांसह सत्ताधारी भाजपा, आमदार, महापौरांवर मोठया प्रमाणात टीकेची झोड उठली. अखेर शनिवारी सकाळी तळ मजल्यावर लाकडी पार्टिशन टाकून पालिकेने दवाखाना सुरु केला.

## संपादकीय...

# लाजिरवाणी संगीत खुर्ची



**संपादक:- दिपक मोरेश्वर नाईक**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीने आलोक वर्मा यांना केंद्रीय अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) संचालकपदावरून दूर केल्याची घटना ताजी असतानाच विशेष संचालक राकेश अस्थाना यांनाही सरकारने 'सीबीआय'च्या बाहेर काढले आहे. त्यांच्याच जोडीने ए. के. शर्मा, एम. के. सिन्हा आणि जयंत नाईकनवरे यांचीही बदली झाली आहे. नवीन संचालक निवडण्यासाठी समितीची बैठक होण्याच्या आठवडाभर आधीच हे पाऊल उचलून सरकारने सीबीआयला पुन्हा चर्चेत ठेवले आहे. वर्मा-अस्थाना यांच्यातील भांडणे, परस्परांच्या विरोधात त्यांनी केलेले लाचखोरीचे आरोप, सरकारचा हस्तक्षेप, वर्मा यांची उचलबांगडी, निवड समितीचे सदस्य आणि काँग्रेसचे नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी त्याला केलेला विरोध आणि वर्मा यांचा राजीनामा या घटनाक्रमामुळे देशातील सर्वोच्च तपास यंत्रणेची लक्तरे केव्हाच वेशीवर टांगली गेली आहेत. एक स्वतंत्र तपाससंस्था ही सीबीआयची ओळख पुसली गेली असून, सरकारच्या 'सोनेरी पिंजऱ्यातील पोपटा'सारखी तिची स्थिती झाल्यालाही बराच काळ लोटला. आता तिचे पुरते राजकियीकरण झाले असून, आपल्या भात्यातील हत्यार म्हणूनच सरकार सीबीआयकडे पाहत असल्याचे दिसते. कोणताही पक्ष सत्तेवर असला, तरी सीबीआयचा गैरवापर थांबत नाही. मोदी सरकारच्या काळात तो कायम तर राहिला आहेच; परंतु तिचा ऱ्हासही झाला आहे. यामुळे सीबीआयची विश्वासार्हता पणाला लागली असून, ती परत मिळविण्याचे आव्हान या यंत्रणेसमोर आहे.

ज्या अस्थाना यांना सरकारने केंद्रीय तपास यंत्रणेच्या बाहेर काढले, त्यांच्याच हाती या यंत्रणेची धुरा सोपविण्याचा प्रयत्न झाला होता. अस्थाना हे गुजरात केडरचे अधिकारी असून, त्यांना सरकारने सीबीआयचे हंगामी संचालक केले होते. मात्र, त्यांच्या नियुक्तीला न्यायालयात आक्षेप घेतला गेल्यानंतर सरकारने वर्मा यांना संचालक, तर अस्थानांना विशेष संचालक केले. अस्थानांची अशी नियुक्ती करण्यामागे सरकारची वेगळी गणिते असणार; परंतु यामुळे सीबीआयमध्ये वर्मा आणि अस्थाना अशी दोन सत्ताकेंद्रे निर्माण झाली. त्याची परिणती या दोन्ही केंद्रांतील भांडणात झाली. कुरबुरीचे रूपांतर परस्परांवरील लाचखोरीच्या आरोपांत झाले. यात सीबीआयची अब्रूच गेली. संचालक आणि विशेष संचालक परस्परांवर काही कोटी रुपयांच्या लाचखोरीचे आरोप करीत असतील, तर प्रत्यक्षात तिथे किती प्रमाणावर भ्रष्टाचार होत असेल, असा प्रश्न पडू शकतो. वर्मा-अस्थाना यांच्या भांडणामुळे सीबीआयने ऱ्हासपर्वाचा नवा तळ गाठला. या दोघांत सुरुवातीला आरोप झाल्यानंतर अंतर्गत बाब म्हणून सरकार मौन बाळगून होते; नंतर दोघांनाही रजेवर पाठवून सरकारने पावले उचलली. मात्र, वर्मा यांची फेरनियुक्तीचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला. त्यानंतर पंतप्रधान मोदी, काँग्रेस नेते खर्गे आणि सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीश ए. के. सिक्री यांच्या निवड समितीने २-१ बहुमताने वर्मांची उचलबांगडी केली. केंद्रीय दक्षता आयोगाच्या अहवालानुसार वर्मा दोषी असल्याने हा निर्णय घेतला गेला. मात्र, नैसर्गिक न्यायाचे तत्त्व वर्मांसाठी डावलल्याची भावना निर्माण झाली आणि म्हणूनच सरकारवरील संशयाचे धुके गडद झाले.

वर्मा-अस्थाना यांच्या भांडणाचे मूळ कशात आहे हा प्रश्नही सरकारवरील संशय वाढवितो. वर्मा यांच्यानंतर नवीन संचालक नेमण्यासाठी हालचाली सुरू असताना अस्थानांसह काही अधिकाऱ्यांच्या बदल्या करून सरकारने पुढचे पाऊल उचलले आहे. शर्मा, सिन्हा आणि नाईकनवरे या अधिकाऱ्यांच्या बदल्यांमागील अर्थही आता शोधला जात आहे. सीबीआयमध्ये सहसंचालक असलेले शर्मा गुजरात केडरचे आयपीएस अधिकारी आहेत. ते वर्मा यांचे निकटवर्तीय मानले जातात. अस्थानांच्या विरोधात जी तक्रार केली गेली होती, तिचा तपास शर्मा यांच्या नेतृत्वाखाली होत होता. वर्मा-अस्थाना यांच्या बदल्यांनंतर सरकारने शर्मा यांचीही बदली केली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने वर्मांची फेरनियुक्ती केल्यानंतर त्यांनी शर्मा यांची परत सहसंचालकपदी नियुक्ती केली होती. अर्थात वर्मा यांच्या उचलबांगडीनंतर शर्मा यांना तिथून हटविण्यात आले होते. अस्थाना यांनी शर्मा यांच्या विरोध मंत्रिमंडळ सचिवाकडे पूर्वी तक्रारही केली होती. बदली करण्यात आलेले सिन्हा यांनी सर्वोच्च न्यायालयात राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांच्यावर हस्तक्षेपाचा आरोप करीत याचिका दाखल केली होती. नाईकनवरे यांच्या बदलीचा मात्र या प्रकाराशी संबंध नसल्याचे सांगितले जाते. एकूणच वर्मा-अस्थाना भांडणातील सर्व प्रमुख अधिकाऱ्यांना दूर करण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे. या 'संगीत खुर्ची'मुळे सीबीआयची प्रतिमा काही बदलणार नाही. त्यासाठीचा मार्ग मात्र दूरचा आहे.

# 'चाळ' आणि 'टाळ'!



आपल्या मताद्वारे सरकार निवडण्याची समज असलेल्या नागरिकांवर कायद्याचा बडगा उगारून किंवा नियमांचे फास आवळून बंधने लादता येत नाहीत हे याआधी वारंवार व आजही जागोजागी स्पष्ट दिसत असताना, डान्स बारवर कायद्याने बंदी घालण्याच्या सरकारच्या इराद्यास सर्वोच्च न्यायालयाने संयमित लगाम घातला हे बरेच झाले. तसे पाहिले, तर महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा पहिल्यापासूनच विविधांगी आहे. या परंपरेला टाळ प्रिय आहेच, पण चाळाचेही वावडे नाही. ग्रामीण भागातील देवादिकांच्या जत्रा-उरुसांमध्ये तमाशाचा फड लागला नाही, असे कधी झालेले नसल्याने, डान्स बारच्या रूपाने पसरलेली 'चाळ संस्कृती' संपविण्यासाठी कायदा पुरेसा पडणार नाही, हे सरकारने ओळखावयास हवेच होते. तसेही, कायद्याने बंदी असलेल्या किती तरी गोष्टी प्रत्यक्षात कायद्यांनाच धाब्यावर बसवून पुढे सुरूच ठेवण्याची समांतर परंपरा आसपास सर्वत्र लपूनछपून वा उघडपणाने सुरू असताना, डान्स बारवरील निर्बंध शिथिल करण्याच्या निर्णयाने नेमके काय साधले होते, याची या क्षेत्रातील जाणकारांना किंवा डान्स बारमध्ये गेल्याखेरीज ज्यांचा दिवस संपत नाही त्यांना नेमकी माहिती आहेच. त्यामुळे निर्बंध शिथिल केले म्हणून लगेचच डान्स बारमध्ये गर्दीचा ओघ सुरू होईल या भाबडय़ा भयाची पांघरुणे घेतलेल्यांनी, बंदीच्या काळात डान्स बारची स्थिती नेमकी काय होती याविषयीच्या अज्ञानात राहिलेलेच चांगले. आता तो अज्ञानाचा अंध:कार न्यायालयाने दूर केला असून जे काही चालणार आहे, ते सर्वांनाच स्वच्छ पाहता येणार आहे. शिवाय, सज्ञान व्यक्तीस स्वयंआचरणाचे स्वातंत्र्य असल्याने व त्या स्वातंत्र्याचा त्याने विवेकाने वापर करावा असे गृहीतच असल्याने डान्स बार सुरू झाले म्हणजे तिकडे झुंडी वळाव्यात असे अजिबातच कोणासही अपेक्षित नसणार. उलट, न्यायालयाच्या नव्या निर्णयामुळे, सज्ञान व्यक्तीस नेमका विचार करण्याची गरज अधोरेखित झाली आहे. म्हणजे, समजा एकाच गल्लीत एखादे प्रार्थनास्थळ आहे आणि त्याच्याच शेजारी डान्स बार आहे, तर कोठे जाण्यात आपले हित आहे आणि कोठे जाण्याने आपल्यासह आपल्या कुटुंबीयांसही मनस्ताप होणार आहे, एवढा सारासारविचार करून निर्णय घेण्याची मुभा न्यायालयाने दिली आहे, हे स्वागतार्हच आहे.

केवळ कायद्याने बंदी आहे म्हणून एखादी गोष्ट संपली, असे होत नसल्याचा सार्वत्रिक अनुभव असतानाही व एखादी गोष्ट हानीकारक आहे असा धोशा लावूनदेखील त्यांना आपल्या आयुष्यात कायमचे स्थान देणाऱ्यांच्या विचारावर कायद्याचा बडगा काहीच परिणाम करू शकत नाही याची असंख्य उदाहरणे आसपास असताना, न्यायालयाने अटी शिथिल केल्या म्हणून आता डान्स बारचे दुष्परिणाम भोगावे लागतील असे म्हणणे हा शहाजोगपणा ठरतो. तसे तर, बंदी असल्याच्या काळात डान्स बार सुरू होतेच आणि त्यामध्ये जाण्याची चटक लागलेल्यांना चोरून, लपतछपत जावे लागत असे. नोटाबंदीनंतरच्या काळात बारमधील नर्तकींवर उधळण्यासाठी नोटांची चणचण भासू लागल्यावर उपनगरांतील काही चोरटय़ा डान्स बारमध्ये ठरावीक रकमेची कूपन्स तयार करण्यात आल्याचेही उघडकीस आलेच होते. त्यामुळे एखाद्या कायद्याने बंदी घातली किंवा मुभा दिली यावर कोणत्या गोष्टीचा अंत वा अस्तित्व अवलंबून असते असे नाही, तर माणसाची विवेकबुद्धी विकसित करणे हाच त्यावरील एकमेव मार्ग असल्याने, डान्स बारच्या विरोधातील साऱ्या सुरांनी आता विवेकाचा आवाज वाढविण्याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. विवेकवादाचा विस्तार आणि विवेकाचे संस्कार समाजावर घडविण्याचा एकमेव उपाय अशा गोष्टींची उपयुक्तता रोखण्यासाठी समर्थ असताना, सरकार किंवा न्यायालयांच्या निर्णयावर नाके मुरडण्यापेक्षा, समाजाच्या मानसिकतेत विवेकी बदल घडविणे ही काळाची गरज ठरणार आहे.

तसे पाहिले, तर नाचगाणे हा प्रकार महाराष्ट्राच्या संस्कृतीस नवादेखील नाही. कोणत्याही सांस्कृतिक कार्यक्रमाचे ते अविभाज्य अंग आहे. डान्स बारमध्ये बीभत्स, अश्लील नृत्य करण्यावरील सरकारने घातलेली बंदी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या ताज्या निर्णयात कायम ठेवल्याने, डान्स बार संस्कृतीला विवेकाचा चेहरा चढविण्याचा एक नवा प्रयत्न या निमित्ताने सुरू झाला आहे असे म्हणता येईल. देवाच्या जत्रेतील नृत्याच्या कार्यक्रमांना विवेकाच्या मर्यादा असतात. तेथे बीभत्सपणास किंवा अश्लीलतेस थारा नसावा असे अपेक्षित असते. अशा अलिखित अपेक्षांमुळे तेथे थिरकणारी पावले आणि घुमणारा ताल प्रेक्षकांचा तोल ढळू देत नाही. डान्स बारच्या अटी शिथिल करताना तेथील नृत्याविष्कारांकडून न्यायालयाने बहुधा हीच अपेक्षा ठेवली असावी. सण-जत्रांतील कार्यक्रमांच्या निमित्ताने होणाऱ्या नृत्यादी कार्यक्रमांचा प्रेक्षक मद्याचे चषक उघडपणे हाती घेऊन त्या करमणुकीचा आनंद लुटत नाही, कारण तेथे प्रेक्षकास विवेकाचे भान असते. मंदिरे आणि मदिरालये यांतील सीमारेषांची स्पष्ट जाणीव प्रत्येकास असते असे सामाजिक गृहीतक असल्याने, डान्स बारमध्ये मद्यपानास बंदी हा तसाही सरकारचा नियम काहीसा आततायीच होता. न्यायालयाने तो रद्द केला हे योग्य झाले. अर्थात डान्स बारमध्ये मद्यपानास मनाई करण्याची अट रद्द झाली आहे म्हणून कोणी नव्याने मद्यपानास सुरुवात करावी किंवा मद्यपान करणाऱ्या प्रत्येकाने दररोज रात्री डान्स बारमध्ये गर्दी करावी असे घडणे केवळ अशक्यच असते. त्यामुळे अशा अटी रद्द होताच आकाश कोसळणार अशी भीती बाळगणे बाळबोध ठरेल. उलट, न्यायालयाने समाजाच्या विचारशक्तीवर आणि विवेकबुद्धीवर विश्वास ठेवला आहे, ही समाधानाची बाब आहे. न्यायालयाच्या निर्णयामुळे समाजातील वेगवेगळ्या स्वाभाविक प्रवृत्ती अधिक ठळकपणे स्पष्ट होणार आहेत, ही एक चांगली बाब आहे. डान्स बारचा मालक चारित्र्यवान असावा, अशी सरकारची अपेक्षा होती. त्यावर न्यायालयाने फुली मारली. चारित्र्य हीच जेव्हा सापेक्ष आणि संशोधनाची बाब ठरते, तेव्हा कोणास चारित्र्यवान ठरवावे वा कोणास चारित्र्यहीन ठरवावे याचाच संभ्रम वाढण्याची आणि डान्स बारसारख्या व्यवसायाला चारित्र्याचा मुलामा चढवून मगच त्याला परवानगी देणे हा शहाजोगपणा ठरण्याचीच शक्यता अधिक! मुळात चारित्र्याच्या संकल्पनाच व्यक्ती, समूहाच्या विचार-संस्कारांनुसार वेगवेगळ्या असतात. चारित्र्याच्या परंपरागत समजुतींनुसार, ज्या ठिकाणी चारित्र्यवान व्यक्ती असणे अपेक्षित असते, तेथे बसणाऱ्यांकडून अनेकदा अपेक्षाभंगाचेच दु:ख पदरी पडल्याचा अनुभव येत असतो. मंदिराचे पुजारी भाविकांची हत्या करतात आणि मंदिरांच्या आवारात, मूर्तीच्या पायाशी मृतदेहांची विल्हेवाट लावतात अशा बातम्या जेव्हा कानावर आदळतात, तेव्हा चारित्र्यवान कोणास ठरवावे हा प्रश्न पडून संभ्रमच वाढत असतो. तेव्हा ज्या संकल्पनेबाबतच संभ्रम आहे, त्या संकल्पनेस महत्त्व देऊन कोणत्याही गोष्टीवर सात्त्विक चेहरा चढेल असे समजणेही गैरच ठरण्याची शक्यता असल्याने ती विवादास्पद संकल्पनाच पुसून टाकणे योग्य ठरते. डान्स बारचा मालक गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असू नये ही सरकारी अटदेखील न्यायालयाने रद्द केली. या व्यवसायाभोवती असणाऱ्या वलयाची कल्पना यावी एवढा समंजसपणा आता समाजाकडे असावयास हवा, असेच बहुधा न्यायालयास अपेक्षित असावे.

त्यामुळे डान्स बारवरील अटी शिथिल केल्या म्हणजे आकाश कोसळले असे समजून आक्रोश करण्यापेक्षा, कोणत्या गोष्टीचा किती लाभ घ्यावा याचा विवेक समाजात रुजविण्यासाठी प्रयत्न करणे अधिक गरजेचे आहे. समाजाला दिशा देण्याची प्रामाणिक इच्छा असणाऱ्या सर्वांनीच त्यासाठी एकत्रित प्रयत्न केले, तर आसपास कितीही मोठय़ा आवाजात 'चाळ' वाजू लागले, तरी समंजस कानांना कुठे तरी कोपऱ्यात घुमणाऱ्या टाळांचा नाद साद घालेल व आपली पावले कोठे वळवावीत याचे भान माणसास येईल. व्यक्तीच्या चांगुलपणावरील विश्वास हाच न्यायालयाच्या नव्या निर्णयाचा पाया असल्याने, तो सार्थ करायचा की फोल ठरवायचा हे ज्याने त्याने ठरविलेले बरे!

# मीरा रोड : प्रसुतीगृहावरून भाजपा आणि काँग्रेसमध्ये खडाजंगी

**मीरा रोड - पालिका आरक्षणातील ७११ रुग्णालयात असलेल्या पालिकेच्या जागेत दवाखाना सुरू केल्याचा भाजपाकडून महासभेत विरोध करण्यात आला. तर आधीच या प्रकरणात टीकेची झोड उठत असल्याने अडचणीत आलेल्या भाजपानेकाँग्रेसचे माजी आमदार मुझफ्फर हुसेन यांच्याशी संबंधित संस्थेच्या रुग्णालयाकडे बोट दाखवत तेथे करारानुसार सवलत मिळत नसल्याचा मुद्दा मांडला. काँग्रेसने देखील शिवसेनेच्या साथीने त्यास प्रत्युत्तर दिल्याने राजकीय खडाजंगी चांगलीच रंगली.**

पालिका आरक्षणात स्वत:चे ७११ रुग्णालय सुरू करणाऱ्या भाजपा आमदार नरेंद्र मेहता व संबंधितांच्या कंपनीने गेली ६ वर्ष पालिकेला मात्र दवाखाना व प्रसुतीगृहसाठी बांधकाम दिले नसल्या वरुन सामाजिक संस्थांनी चालवलेल्या आंदोलनामुळे मेहता आणि भाजपा चांगलेच अडचणीत आले आहेत. टीकेची झोड आणि रुग्णालय चोर असे आरोप होत असल्याने भाजपा नेतृत्वाने देखील विरोधाची धार कमी करण्यासाठी हुसैन यांच्या संस्थेच्या रुग्णालयाकडे मोर्चा वळवला.

त्या अनुषंगानेच महासभेत शहरातील नागरिकांना शासनाच्या धोरणानुसार मोफत औषधोपचार देणे असा विषय महापौर डिंपल मेहता यांनी आणला होता. त्याला प्रशासनाचा गोषवाराच नसल्याने केवळ चर्चा झडली. पण चर्चेत भाजपाचे स्थायी समिती सभापती रवी व्यास, नगरसेवक ध्रुवकिशोर पाटील, डॉ. राजेंद्र जैन, डॉ. सुशील अग्रवाल, सुरेश खंडेलवाल, वंदना मंगेश पाटील आदींनी हुसेन यांच्या उमराव संस्थेच्या रुग्णालयात शासकिय कर्मचारी, दुर्बल घटकांसाठी मोफत उपचार मिळत नसल्याचे तसेच भरमसाठ पैसे घेतले जात असल्याचा मुद्दा मांडला.

त्यावर काँग्रेसचे अनिल सावंत यांनी पालिकेकडे मोफत उपचार केलेल्यांची यादी व आकडेवारी नियमित दिली जात असल्याचे सांगत ७११ कंपनीनेच उलट ६ वर्ष पालिकेला जागा न दिल्याने नागरिकांना वैद्यकिय सुविधेपासून वंचित ठेवल्याचे प्रत्युत्तर दिले.

उपमहापौर चंद्रकांत वैती यांनी मात्र मुझफ्फर हुसेन हे दानशुर असून त्यांच्याशी सवलती बाबत चर्चा करावी, असे सांगत भाजपा नगरसेवकांच्या आरोपांची हवाच काढून टाकली. रुग्णालयाबाहेर सवलती बद्दलचा फलक लावावा, असे निर्देश महापौरांनी दिले.

***पालिकेचा दवाखाना सुरू केल्याचा भाजपाकडून विरोध***

७११ रुग्णालयात पालिकेने शनिवारी सकाळी दवाखाना सुरु केला म्हणून भाजपा नगरसेवकांनी त्याचा जोरदार विरोध केला. ध्रुवकिशोर पाटील यांनी तर, तिकडे आधी दवाखाना का सुरू केला असे प्रशासनाला खडसावले. तिकडे श्रीमंत लोकं राहतात असे ते म्हणाले. त्यावर पालिकेची जागा मिळवण्यासाठी आणि दवाखाना सुरू करण्यासाठी आंदोलन करावे लागते हे लाजिरवाणे असल्याचा टोला काँग्रेस - सेना नगरसेवकांनी लावला.

# गॅसचोरी करणाऱ्या दोघांना बेड्या


**मनोर :** मुंबई अहमदाबाद महामार्गालगत चिलहार गावच्या हद्दीत हरबन्स पंजाब ढाब्यावर रात्री १०.३० च्या सुमारास पोलीस अधीक्षकांच्या पथकाने छापा टाकून गॅसचोरी करण्याऱ्या दुकलीला टँकर, सिलेंडर व साहित्यासह अटक केले. त्यांच्यावर मनोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

रात्री पोलीस अधीक्षक पालघर यांच्या विशेष पथकाने गस्त घालीत असताना गॅसचा टँकर मधुन पाईप द्वारे सिलेंडर गॅसची चोरी करताना दोघांना रंगेहाथ पकहले. चनदीका यादव (३६) प्रवीण पपू नाईक (१८) यांना ताब्यात घेण्यात पोलिसांना यश आले तर टँकर चालक फरार झाला आहे. तिघांवर मनोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे. मुंबई अहमदाबाद महामार्गावर पुन्हा अवैध धंदे सुरू झाले असून ज्वालाग्राही



पदार्थ व तेल माफिया पुन्हा डोकं वर काढत आहेत. पालघर अधीक्षकांच्या विशेष पथका मधील सहा फोजदार कदम, सुरवंशी, मयूर बगल व इतर पोलिसांनी ही कारवाई बजावली.

# ठाण्यात बेशिस्त खासगी वाहतुकीची भर



**ठाणे :** रस्ते, मेट्रो आणि पुलांची बांधकामे यामुळे गेल्या दोन महिन्यांपासून ठाणे शहर वाहतूक कोंडीच्या विळख्यात अडकले असताना अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बस गाडय़ा कोंडीत भर घालत आहेत. कोंडीस कारण ठरणाऱ्या खासगी बसचालकांवर प्रादेशिक परिवहन आणि वाहतूक पोलीस विभाग कारवाई का करीत नाही, असा संतप्त प्रश्न नागरिक करत आहेत.

ठाण्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट नसल्याने खासगी बसचालकांचे फावले आहे. अवैध खासगी प्रवासी बस गाडय़ा दिवसागणिक वाढत आहेत. हे वाढते प्रमाण आणि चालकांकडून सर्रास केला जात असलेला नियमभंग यामुळे रस्त्यावरील वाहतुकीत अडथळे येत आहेत. वाहतूक पोलीस मात्र या नियमभंगाकडे दुर्लक्ष करीत आहेत, असे रहिवाशांचे म्हणणे आहे.

पूर्वेतील कोपरी भागातून अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी बस गाडय़ांचे प्रमाण अधिक आहे. नवे ठाणे अशी ओळख असलेल्या घोडबंदर भागात नवनवी संकुले निर्माण झाल्याने तिथून ठाणे स्थानकाच्या दिशेने प्रवास करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. या मार्गावर परिवहन बस गाडय़ा कमी असून रिक्षाचालकही १०० ते २०० रुपये भाडे आकारतात. याचा फायदा घेत खासगी बसचालक ठाणे पूर्व ते घोडबंदर या मार्गावर अवैध प्रवासी वाहतूक करतात. कंपनीतील कर्मचाऱ्यांची वाहतूक करण्यासाठी असलेल्या या खासगी बस गाडय़ा नियोजित ठिकाणी परतताना कोपरीतून अवैधपणे प्रवासी वाहतूक करतात. सकाळी आणि सायंकाळी कोपरी भागातून अवैध वाहतूक करणाऱ्या खासगी बस गाडय़ांचे प्रमाण हे ८०हून अधिक असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. कोपरीतील वाहतूक पोलीस चौकीसमोरूनच खुलेआम ही अवैध वाहतूक सुरू असते. वाहतूक पोलीस मूग गिळून गप्प बसलेले दिसतात. ठाणे पूर्व रेल्वे स्थानक ते कासारवडवली या मार्गावर बेकायदा धावणाऱ्या खासगी बस गाडय़ांचे परवाने रद्द करण्याचे कोणतेही अधिकार नसल्यामुळे वाहतूक पोलीस केवळ दंडात्मक कारवाई करीत आहेत. मात्र तरीही गोरखधंदा सुरूच आहे.

नवे ठाणे अशी ओळख असलेल्या घोडबंदर मार्गावरही अवैध वाहतूक मोठय़ा प्रमाणावर सुरू असते. सध्या महापालिका आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण रस्ते आणि मेट्रोची कामे करीत आहेत. त्यामुळे अरुंद झालेल्या रस्त्यांवर मोठय़ा प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असून या कोंडीत खासगी बस गाडय़ांची भर पडत आहे. ठाणे महापालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या ताफ्यात पुरेशा बसगाडय़ा नाहीत. त्यामुळे प्रवासी खासगी बस वाहतुकीकडे वळले आहेत.

# डोंबिवलीत भाजपा पदाधिकाऱ्याच्या दुकानातून १७० प्राणघातक शस्त्रे जप्त



**डोंबिवली-** डोंबिवलीतील भाजपाचा पदाधिकारी धनंजय कुलकर्णी याच्या दुकानातून कल्याण गुन्हे शाखेने १७० प्राणघातक शस्त्रे जप्त केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. धनंजय कुलकर्णी (वय ४९) असे या भाजपा पदाधिकाऱ्याचे नाव असून त्याची रवानगी आधारवाडी तुरुंगात करण्यात आली आहे.

डोंबिवलीतील महावीरनगर भागात अरिहंत इमारतीच्या तळमजल्यावर तपस्या फॅशन हाऊस हे दुकान आहे. हे दुकान भाजपा पदाधिकारी धनंजय कुलकर्णी याच्या मालकीचे आहे. धनंजय कुलकर्णी हा भाजपाचा डोंबिवली शहर उपाध्यक्ष आहे. त्याच्या दुकानात शस्त्रसाठा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. यानुसार पोलिसांनी छापा टाकून शस्त्रसाठा जप्त केला. जप्त करण्यात आलेला शस्त्रसाठा सुमारे २ लाख रुपयांचा आहे. यात तलवारी, एअर गन अशा शस्त्रांचा समावेश आहे. भाजपा पदाधिकाऱ्याच्या दुकानातून शस्त्रसाठा जप्त केल्याने खळबळ उडाली असून याप्रकरणामुळे भाजपाची कोंडी होण्याची शक्यता आहे.

# महाराष्ट्रदिनी सिडकोच्या ९० हजार घरांची सोडत

**नवी मुंबई - सिडकोच्या गृहनिर्मितीला मिळणारा भरघोस प्रतिसाद पाहता राज्य शासनाच्या आदेशाने सिडकोने ८९ हजार ७७१ घरांचा आराखडा तयार केला असून पुढील आठवडय़ात त्याची बांधकाम निविदा प्रसिध्द केली जाणार आहे. येत्या काळात ऑनलाइन विक्री सुरू करून महाराष्ट्रदिनी अर्थात १ मे रोजी या घरांची सोडत काढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सिडकोच्या इतिहासातील हा सर्वात मोठा गृहनिर्मिती प्रकल्प आहे.**

सिडकोच्या घरांना नवी मुंबईकर कितीही नावे ठेवत असले तरी विक्रीसाठी तयार करण्यात येणाऱ्या घरांना मिळणारा भरघोस प्रतिसाद पाहता सिडकोने ८९ हजार ७७१ घरांचा आराखडा तयार केला आहे. केंद्र सरकारच्या सर्वासाठी घरे या योजनेअंर्तगत राज्यात सिडको व म्हाडा सर्वाधिक घरे बांधणार आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महामुंबई क्षेत्रात महागृहनिर्मिती करण्याचे आदेश सिडकोला दिले आहेत. सिडकोचे नवीन व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनीही सर्वसामान्यांचे स्वप्न पूर्ण करणारी परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीला प्राधान्य दिले आहे. बांधकाम सुरू असतानाच घरांची विक्री ही नवीन संकल्पना




त्यांनी प्रत्यक्षात आणली आहे. सिडकोकडे मोठय़ा प्रमाणात निधी शिल्लक असल्याने सिडको यापूर्वी घरे बांधून तयार झाल्यानंतरच ग्राहकांना चढय़ा किमतीत विकून गडगंज पैशा जमविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते. या अर्थशास्त्राला फाटा देऊन चंद्र यांनी बांधकामानुसार ग्राहकांकडून मासिक हप्ते आकारण्यास सुरुवात केल्याने ग्राहकांना बँक कर्जाचा पडणारा भुर्दंड वाचला आहे.

सुमारे १५ हजार आणि शिल्लक एक हजार १०० घरांना मिळणारा प्रतिसाद पाहता सिडकोने ८९ हजार ७७१ घरांचा आराखडा दक्षिण नवी मुंबई भागात तयार केला आहे. यातील ५३ हजार ४९३ घरे ही पंतप्रधान आवास योजने अंर्तगत आर्थिकदृष्टय़ा दुर्बल घटकांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत, तर शिल्लक ३६ हजार २८८ घरे ही अल्प उत्पन्न गटासाठी आहेत. यासाठी केंद्र सरकारकडून अनुक्रमे अडीच व २ लाख ६७ हजार रुपये अनुदान देखील मिळणार आहे. येत्या पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने तयार होणाऱ्या या घरांची बांधकाम निविदा येत्या आठवडय़ात प्रसिद्ध केली जाणार असून या महागृहनिर्मितीला प्रत्यक्षात दोन ते तीन महिन्यात सुरुवात होणार आहे. त्यामुळे बांधकाम आणि विक्री एकाच वेळी करण्याच्या नवीन धोरणानुसार या घरांची ऑनलाइन विक्री सुरू करून महाराष्ट्रदिनी सोडत काढली जाणार आहे.

## निवडणुकीपूर्वी काँग्रेस देणार भाजपला धक्का, दोन खासदार गळाला?

**मुंबई-** आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्ष काही उमेदवार आयात करण्याची शक्यता आहे. पुणे, रत्नागिरी, उत्तर मध्य मुंबई या लोकसभा मतदार संघात नवीन उमेदवार देण्यासाठी काँग्रेसकडून





जोरदारी हालचाली सुरू झाल्याची माहिती आहे. काही काळापूर्वी काँग्रेस सोडून गेलेले कोकणातील ताकदवान नेते नारायण राणे यांना काँग्रेस पुन्हा एकदा जवळ करण्याची शक्यता आहे. रत्नागिरी लोकसभा मतदार संघासाठी राणे यांना संपर्क करण्यासाठी एका मोठ्या काँग्रेस नेत्याने मध्यस्थी केल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. पुणे लोकसभा मतदारसंघासाठी काँग्रेसकडून संजय काकडे यांच्या नावाचा विचार चालल्याची माहिती आहे. संजय काकडे हे सध्या भाजपचे सहयोगी खासदार आहेत. पण गेल्या काही दिवसांपासून ते पक्षाला अडचणीत आणणारी विधानं करत आहेत. दरम्यान, नारायण राणे यांनी सध्या भाजपची सलगी साधलेली आहे. भाजपच्याच कोट्यातून त्यांना राज्यसभेची खासदारकीही मिळाली आहे. पण भाजपची शिवसेनेबरोबर युती होऊ शकते. अशावेळी भाजप राणेंचा पत्ता कट करण्याची शक्यात आहे.

## आठवीतील मुलीवर अत्याचार: ५ अटकेत, काकानेच केला होता पहिल्यांदा बलात्कार

**उस्मानाबाद-** हराळी (ता. लोहारा) येथील ज्ञानप्रबोधिनी निवासी शाळेत आठवीत शिकणाऱ्या व आई-वडील नसलेल्या मुलीवर तिच्या काकासह (मावशीचा नवरा) शाळेचे दोन शिक्षक, सुरक्षा रक्षक, शिपाई आणि शेतात काम करणाऱ्या कामगारांनी अत्याचार केल्याची संतापजनक घटना उघडकीस आली आहे. मुलीच्या जबाबावरून ६ जणांवर लोहारा पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून ५ जणांना अटक झाली आहे. न्यायालयाने आरोपींना ७ दिवसांची कोठडी सुनावली आहे. दरम्यान, गावकऱ्यांनी शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

पुण्यातील ज्ञानप्रबोधिनी संस्थेमार्फत चालवल्या जाणाऱ्या या निवासी शाळेत वास्तव्य आणि



शिकणाऱ्या मुलीवर शिक्षक दत्ता जमदाडे, चित्रकला शिक्षक विजय तोरडकर, सुरक्षा रक्षक नागनाथ कोकाटे, शिपाई विक्रम काजळे आणि शेतीचे काम करणाऱ्या सुयश जोशी यांनी २ महिन्यांपासून शारीरिक अत्याचार केला.

२ महिन्यांपासून शाळेतील काही कर्मचाऱ्यांकडून मुलीवर अत्याचार झाल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू होती.१६ जानेवारीला मुलीने आजीला अत्याचाराची माहिती दिली. आजीने ही माहिती संस्थेला सांगितल्यानंतर संस्थेच्या कृषी विद्यालयाच्या प्राचार्या गौरी कापरे यांनी मुलीला घेऊन लोहारा पोलिसांत धाव घेतली. त्यानंतर गुरुवारी (दि.१७) पोलिसांनी हे प्रकरण समजून घेत इन कॅमेरा मुलीचा जबाब घेतला.

### पोस्कोअंतर्गत गुन्हा, एक जण फरार

तक्रार आल्यानंतर पोलिसांनी दत्ता जमदाडे, विजय तोरडकर, नागनाथ कोकाटे, विक्रम काजळे, सुयश जोशी, जयराम मोरे यांच्यावर भादंवि ३७६ तसेच पोस्कोअंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यापैकी ५ जणांना अटक करण्यात आली आहे. उस्मानाबाद कोर्टाने त्यांना ७ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. एक जण फरार आहे.

## आगरी कोळी मालवणी महोत्सव

आगरी कोळी मालवणी महोत्सव अतिशय दिमाखदार सोहळा मिरा भाईंदर येथे पार पडला. सतत १० दिवस हिंदुह्दय सम्राट बाळासाहेब ठाकरे मैदानात आगरी कोळी मालवणी महोत्सव येथील स्थानिक नेते आमदार प्रताप सरनाईक यांच्या मार्गदशनाने नगरसेवक गटनेते हरिश्चद्रं आमगांवकर यांनी आयोजित केला होता. हिंन्दू संस्कृतीचा वारसा जपणारा हा महोत्सव सतत १० वर्षे नगरसेवक हरिश्चद्रं आमगांवकर आयोजित करतात. या ठिकाणी मराठी माणुस व्यवसायात येण्यासाठी विविध पदार्थांचे व वस्तूंचे स्टॉल उभारतात. मिरा भाईंदरच्या मध्यावर हे मैदान असल्यामुळे खूप मोठया प्रमाणात माणसांची गर्दी पहावयास मिळते. रोज नवीन नवीन कार्यक्रम आयोजित करुन नगरसेवक आमगांवकरांनी महोत्सवास गर्दी कायम ठेवण्याचे श्रेय मिळविले. या महोत्सवाला सर्व पक्षीय नगरसेवक ,विविध क्षेत्रातील कार्य सम्राट ,समाजसेवक भेट देतात. या वेळी दादूस ऑर्केस्टा,भजन डबलबारी, किर्तन ,महीलासांठी हळदीकुंकू समारंभ हे कार्यक्रम नामवंत कलाकारांनी सादर केले.

## पोलीस भरतीत मोठे बदल; शारीरिक चाचणीपूर्वी लेखी परीक्षा



राज्य पोलिस दलातील पोलीस शिपाई पदाच्या भरतीसाठी मोठे बदल करण्यात आले आहेत. गृहविभागाने सुरुवातीला शारीरिक चाचणी न घेता लेखी परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय महाराष्ट्र पोलिस शिपाई (सेवा प्रवेश) नियम २०१९ मध्ये सुधारणा केलेल्या आदेशान्वये घेण्यात आला आहे. यापुढे सुरुवातीलाच ९० मिनिटांत १०० गुणांची लेखी परीक्षा घेतली जाणार आहे. तसेच शारीरिक चाचणीतून पुलअप्स आणि लांब उडी वगळण्यात आली आहे.

## राज्यात तरी लोकायुक्त नेमा – अण्णा हजारे

**राळेगणसिद्धी -** लोकपाल व लोकायुक्त कायद्याप्रमाणे विधानसभेत चर्चा करून लोकायुक्त अधिनियम ४ (३) प्रमाणे संशोधन समिती नेमून आपल्या राज्यात तरी लोकायुक्ताची नियुक्ती करावी, अशा मागणीचे पत्र ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शुक्रवारी पाठविले आहे.



'पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारनेही लोकपाल कायद्याची अंमलबजावणी केली नाही. निवडणुकीपूर्वी लोकायुक्ताची नेमणूक करू, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनीही सांगितले होते, असे नमूद करून हजारे यांनी, याच कारणासाठी नाइलाजास्तव मी ३० जानेवारीपासून उपोषण सुरू करत आहे,' असे पत्रात म्हटले आहे. पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री जितेंद्रसिंह यांनाही हजारे यांनी पत्र पाठवून, सरकार खोटारडे असल्याचा आरोप केला आहे. हजारे यांना नुकतेच पंतप्रधान कार्यालयाचे पत्र मिळाले. त्याला उत्तर देताना हजारे यांनी म्हटले आहे, की लोकपाल कायदा होऊन पाच वर्षे होत आहेत. मात्र, सरकारला त्याची अंमलबजावणी जमली नाही. 'लोकपाल'ला कमकुवत करणारा कायदा मात्र २०१६मध्येच केला. त्यावरून सरकारचा खोटारडेपणा उघड होत आहे. शेतमालाला उत्पादनखर्चावर आधारित भाव आणि कृषिमूल्य आयोगाला संवैधानिक दर्जा देण्याच्या मागणीचा पुनरुच्चारही हजारे यांनी या पत्रात केला आहे.

## झाकीर नाईकची १६ कोटीची संपत्ती ईडीकडून जप्त

**नवी दिल्ली-** वादग्रस्त इश्लामिक धर्मप्रचारक झाकीर नाईक विरोधात ईडीने फास आवळला आहे. सक्तवसुली संचालनालय म्हणजेच ईडीने मनी लाँडरिग कायद्यातंर्गत झाकीर नाईकची १६.४० कोटींची संपत्ती जप्त केली आहे. ईडीने शनिवारी याबाबतची माहिती दिली. मुंबई आणि पुण्यात नाईकच्या कटुंबीयांच्या नावे असलेली संपत्ती जप्त करण्याचे आदेश दिल्याचे ईडीने सांगितले. मनी लाँडरिंगद्वारे मिळालेला पैसा लपवण्यासाठी नाईकने पत्नी, मुलगा आणि पुतण्याच्या नावावर संपत्ती खरेदी केल्याचे ईडीने सांगितले. जप्त केलेल्या संपत्तीची अंदाजीत किंमत १६.४० कोटी असल्याचे ईडीने सांगितले. मुंबईतील फातिमा हाईट्स आणि आफिया हाईट्स यांचा जप्त केलेल्या संपत्तीत समावेश आहे. तसेच भांडुपमध्येही त्यांची



संपत्ती सापडली आहे. पुण्यातील एन्ग्रेसिया नावाचा प्रोजेक्टही जप्त करण्यात आला आहे. मनी लाँडरिंगद्वारे मिळालेला पैसा लपवण्यासाठी नाईकने या संपत्तीची खरेदी स्वतःच्या नावावर केली नव्हती. सुरुवातीला त्याने स्वतःच्या नावाने नोंदणी करून नंतर पैसा पत्नी, मुलगा आणि पुतण्याच्या खात्यात वळवला होता. त्यानंतर या संपत्तीची नोंदणी कुटुंबीयांच्या नावे करण्यात आली. आतापर्यंतच्या तपासातून नाईकच्या मनी लाँडरिंगबाबतची माहिती मिळाल्याचेही ईडीने सांगितले. एनआयएने नाईकविरोधात बेकायदा कृत्य केल्याचा गुन्हा दाखल केला होता.

## राज्यात १८ मुलेच अनाथ

**सोलापूर -** राज्य सरकारने शिक्षण व नोकरीत खुल्या प्रवर्गातून अनाथ मुलांसाठी एक टक्का आरक्षण देण्याचा निर्णय एप्रिल २०१८ मध्ये घेतला. राज्यातील बालगृहांमध्ये २०१२ मध्ये सुमारे ७० हजार विद्यार्थी होते, सध्या १८ हजार विद्यार्थी आहेत. या कालावधीत १८ मुलांनाच अनाथ प्रमाणपत्र मिळाल्याचे महिला व बालविकास विभागाच्या सूत्रांकडून सांगण्यात आले. भारतातील बालश्रम ही एक गंभीर समस्या असून त्याचा संबंध थेट गरिबीशी आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकारने अनाथ मुलांना नोकरी व शिक्षणात आरक्षण जाहीर केले. आरक्षणानंतर प्रश्न सुटण्याची आशा असलेल्या अनाथांना प्रमाणपत्रासाठी हेलपाटे मारावे लागत असल्याने अथवा वेळेवर मिळत नसल्याने त्यांना मिळेल ते काम करावे लागत असल्याचे चित्र पहायला मिळत आहे. अनाथ, निराधार बालकांना बालगृहातून बाहेर पडल्यावर अनाथांना राज्य शासनाच्या सवलतीचा लाभ घेता यावा, शिक्षण व नोकरीतही लाभ मिळावा हा आरक्षणाचा हेतू आहे. त्यानुसार संबंधित विद्यार्थ्यांकडे अनाथ प्रमाणपत्र असावे व ते प्रमाणपत्र महिला व बालविकास विभागाकडून मिळेल. त्यांच्या प्रमाणपत्राची महिला व बालविकास पुणे, आयुक्तांमार्फत फेरतपासणी केली जाईल. अशा विद्यार्थ्यांना सरळसेवा भरतीत हे आरक्षण लागू राहील. तसेच शिक्षणात शिष्यवृत्ती, वस्तीगृह व व्यावसायिक शिक्षणांतर्गत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेतही आरक्षण लागू राहील.



## भवन्स महाविद्यालय (अंधेरी) तर्फे आयोजित 'खेळ उत्सव' २०१८-१९ मधील क्रिकेट स्पर्धेत शंकर नारायण महाविद्यालयास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक

**भाईदर (प्रतिनिधी)–** भवन्स महाविद्यालयातर्फे प्रथमच अंतर महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यासाठी खेळ उत्सव २०१८-१९ क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. एकूण १६ महाविद्यालयांनी या स्पर्धेत भाग घेतला. अंतिम सामन्यात शंकर नारायण महाविद्यालयाने उत्कृष्ट फलंदाजी, उत्कृष्ट गोलंदाजी आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षणाच्या जोरावर पनवेल येथील सी. के. टी महाविद्यालयास पराभूत करून प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. भवन्स महाविद्यालयाच्या प्राचार्यातर्फे प्रमाणपत्र व चषक देऊन खेळाडूंना गौरविण्यात आले. शंकर नारायण महाविद्यालयातील हितेश म्हात्रे व किरण पडवळे यांनी स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू व उत्कृष्ट गोलंदाज ही पारितोषिके पटकावली. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक रोहिदास पाटील, सचिव महेश म्हात्रे व प्राचार्य यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

## पंतप्रधानपदाची आस नाही, भाजपला सत्तेतून बाहेर केले पाहिजे -शरद पवार

**कोलकाता-** पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारकडून देशातील घटनात्मक संस्था तसेच लोकशाहीवर हल्ला केला आहे, छोट्या उद्योगांवरही परिणाम झाला आहे, शेतकरी आत्महत्या करत आहेत, त्यामुळे आम्ही एकत्र येऊन सत्ता परिवर्तन करणार आहोत, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी महारॅलीतून हल्लाबोल नरेंद्र मोदी सरकारवर केला. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी २२ विरोधी पक्षांना कोलकात्यामध्ये महारॅलीसाठी एकत्र केले होते. या महारॅलीमध्ये शरद पवार म्हणाले की, नोटबंदी आणि जीएसटीचा निर्णय घेऊन सामान्य जनतेला मोदी सरकारने त्रास



दिला. पंतप्रधानपदाची आस नाही पण भाजपला सत्तेतून बाहेर केले पाहिजे. देशात सत्ताबदल आवश्यक आहे. भाजप प्रत्येक राज्यातून हद्दपार होईल, मोदी सरकारमध्ये अच्छे दिन येऊ शकत नाहीत, भाजपला घालविण्यासाठी लोकांनीच मनाची तयारी केली आहे, फोडा आणि राज्य करा या प्रकारच्या राजकारणावर आपला देश विश्वास ठेवत नाही, असा हल्लाबोल ममता यांनी केला.

## कोल्हापूर जिल्हा रहिवाशी विकास मंडळ आयोजित कोल्हापूर महोत्सव

### जगभरात प्रसिद्ध असलेला कोल्हापूरी खाद्य महोत्सव रंगणार मिरा भाईन्दरमध्ये...

कोल्हापूर आणि तेथील खाद्यसंस्कृती खवय्यांना नेहमीच आकर्षित करत असते. त्यामुळेच कोल्हापुरी खाद्यपदार्थाशी त्यांचे एक वेगळेच नाते निर्माण झाले आहे. हे नाते अधिक घट्ट व्हावे आणि खास कोल्हापुरी चव मिरा भाईन्दर आणि मुंबईकरांना चाखता यावी यासाठी ८ फेब्रुवारी ते १० फेब्रुवारी पर्यंत असा ३ दिवसीय कोल्हापूरी महोत्सव मिरा भाईन्दरमध्ये रंगणार आहे.

या महोत्सवात कोल्हापूरमधील गावरान मिसळ, अस्सल चवीचा तांबडा-पांढरा रस्सा, खांडोळी, मटण लोणचे, मटण-चिकन थाळी, पिठलं भाकरी, अख्खा मसूर, भेळ अशा खाद्यपदार्थाची चव खवय्यांना चाखता येणार आहे. तसच या महोत्सवात कोल्हापुरी संस्कृतीचा अनुभव देणारी एक बाजारपेठ वसविण्यात येणार असून, यात कोल्हापूरी चप्पल, कोल्हापूरी मिरची, कोल्हापूरी गुळ तसच कोल्हापूरी साज या प्रसिद्ध वस्तूही उपलब्ध असतील.

यशस्वी विद्यार्थी व मान्यवरांचा सत्कार केला जाणार आहे.

याशिवाय तिन्ही दिवस मनोरंजनाचे भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. रविवार दि. १० रोजी कोल्हापुरी लावणीचा आनंद घेता येईल.

या कार्यक्रमाचे मा. चंद्रकांत पाटील (मंत्री) हे प्रमुख पाहुणे असतील.

अनेक सिने व नाट्य कलाकार या कार्यक्रमासाठी हजेरी लावणार आहेत

**लय भारी कोल्हापूरी**
**पुरे पुर कोल्हापूर**
**ठिकाण - बाळासाहेब ठाकरे मैदान, इंद्रलोक, भाईन्दर ( पुर्व )**
**श्री विजय पाटील**
**संस्थापक**
**कोल्हापूर जिल्हा रहिवाशी विकास मंडळ**

## बक्षिस म्हणून कमी रक्कम दिल्याने सुनील गावसकरांनी ऑस्ट्रेलियाला सुनावले

**मेलबर्न-** भारतीय संघाने काल (१८ जानेवारी) मेलबर्नच्या मैदानात ऑस्ट्रेलियाचा ७ विकेट्सने पराभव केला. भारताच्या या विजया सोबतच भारताने ऑस्ट्रेलियावर २-१ अशा फरकाने पहिल्यांदाच द्विसंघ मालिका जिंकली. या विजयामुळे भारतावर शुभेच्छांचा वर्षाव होत असताना दुसऱ्या ठिकाणी मात्र भारतीय खेळाडूंना मिळालेल्या बक्षिसांच्या रकमेवरुन भारताच्या माजी क्रिकेटपटू सुनील गावसकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे. काल (१८ जानेवारी) मेलबर्नला



झालेल्या सामन्यात यजुवेंद्र चहालने सहा विकेट घेतल्या तर धोनीने ८७ धावांची नाबाद खेळी केली. मेलबर्नच्या विजयात यजुवेंद्र चहाल आणि महेंद्रसिंह धोनीच्या खेळीचे महत्वपूर्ण योगदान होते. या खेळीसाठी यजुवेंद्र चहलला सामनावीर तर धोनीला मालिकावीरचा किताब देण्यात आला. यावेळी या दोघांना धोनी-चहलला ऑस्ट्रेलिया क्रिकेट बोर्डाकडून ५००-५०० डॉलरचे (३५ हजार) बक्षिस देण्यात आले. धोनी-चहल या दोघांना मिळालेली ३५ हजारांची रक्कम दान केली.





आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट

आश्रय सामाजिक सांस्कृतिक, शैक्षणिक ट्रस्ट व सेव्हन हिल्स हॉस्पिटल अंधेरी यांच्या संयुक्त विद्यमानाने समाजातील व गरीब लोकांसाठी किडनी, कॅन्सर, हृदयरोग, ब्रेन आदी रोगांवर निःशुल्क शस्त्रक्रिया करुन देण्यात येईल. केवळ केसरी आणि पिवळे रेशनकार्डधारक असणाऱ्यांनाच या सेवेचा लाभ मिळेल.

संस्थापकः- श्री. दीपक मोरेश्वर नाईक, मो. ८४२४९८९८९८

email:deepakmnaik@gmail.com, manavadhikar@gmail.com, www.ashraytrust.com

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)